म. ग्रं. सं. ठाणे
य काव्य
ं. ६९२८.

# ांचे अभंग



REFBK-0019487
REFBK-0019487
१८६८

## कै. लो. बाळ गंगाधर टिळक.

किंमत ०२ आणे.

प्रकाशक—रा. महाविरसिंग विठ्ठलसिंग परदेशी, मु. पिंपळगांव
ता. भिमथडी, जि. पुणें, पो. राहूपिंपळगांव.
मुद्रक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें.

# प्रस्तावना.

जे का रंजले गांजले ॥ त्यासि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा ॥ देव तेथेची जाणावा ॥
सं तुकाराम.

मित्रहो ज्यानें महत्प्रयासानें लाधलेल्या नरदेहाचा अन्य कार्यासाठीं व्यय करून, कालाग्नीस आहुति दिली, व खालावलेल्या आर्य समाजास धर्मोन्नति देऊन इहपरत्र साधनाची ओळख पटविली, अशा त्या सत्पुरुष कै० लो. बाळ गंगाधर टिळक यांचे गुणानुवाद गाण्यांत देह झिजविणें हें आपलें कर्तव्य असून आर्यभूमीस अग्रपुजेचा मान सहजच दिल्यासारखा होईल. मग आतां विचार करा कीं, संशयाच्या काहुरानें झांकोळलेल्या मनास ज्ञानवृष्टीनें शांत करून ज्यानें आपल्या प्रचंड मस्तकबलानें व्योमसुद्धां ठेंगणें करून सोडिलें, तर्कबलानें गुप्त ज्ञान दृष्टोत्पत्तीस आणिलें, वक्तृत्वानें बृहस्पतीसारख्यांना मुके केलें, हस्तकलेनें गीतेंतील अव्यक्त व्यक्तीस्वरूपानें दाखविलें, सत्वशक्तीनें भयंकर द्वैतभावनेंत पूज्य भक्ति निष्पन्न करून मुक्तीशीं तें एकच खरें आहे. अशाबद्दलचें प्रतिबिंब मनेन्द्रीयावर स्पष्ट उमटविलें. अन्य पंथानें भटकणाऱ्यास वाणीदंडानें मंथून नवनीत केलें. किर्तिदुर्ग उभारले. सारांश, अशा त्या सद्गृहस्थाचें वर्णन एक मुखानें आटापेल असें वाटत नाहीं; तरी तें एक मुखानेंच अनुवादण्यासारखें असल्यामुळें आपलें कर्म हेंच कीं, देहावर होईपर्यंत या ईश्वरशक्तीचें म्हणजे ईशस्वरूपांत सामावणाऱ्या लोकमान्यांचें चंद्रचकोर न्यायानें प्रेमामृत प्राशन करावें व करतो. अशी आशा आहे.

म. वि. परदेशी.

# अर्पण.

कै॰लो॰ बाळ गंगाधर टिळक
यांच्या सर्वोत्कृष्ठ गुणांत
लुब्ध होऊन ही अभंग
पुष्पांजली समर्थ चर-
णीं प्रेमानें अर्पण
करितों.

बालकृष्णार्पणमस्तु.

आ. म. वि. परदेशी
पिंपळगांवकर.

स. काव्य ६६
काव्य ५५५

# लो. टिळकांचे अभंग.

## अभंग १ ला.

सत्पुरुष म्हणूं त्याला ॥ जो का अनाथ अंकिला ॥
नांव त्यांचें बाळकृष्ण ॥ सत्वसिंधु लोकमान्य ॥
गीता रहस्य विभूती ॥ देवोनिया आम्हां हातीं ॥
सत्य असत्य निवडीलें ॥ भ्रांति पडळ छेंदीलें ॥
दास म्हणे अयसीयाचे ॥ गुण गाता काय वेचे ॥ १ ॥

## अभंग २ रा.

त्यजी नीज कार्य वेगीं ॥ प्राणवेची अन्या लागी ॥
तो हा दिनाचा दातार ॥ रामदासी आवतार ॥
वंशवेली उद्धरली ॥ द्वाही भुवनीं गाजली ॥
दास म्हणे ऐसें व्हावें ॥ अंतीं मरोनी उरावें ॥ १ ॥

## अभंग ३ रा.

घरोघरीं कैचें रत्न ॥ नसें अश्वत्थ सूमन ॥
तेवि गंगाधर सुत ॥ सोमकांत बलवंत ॥
वाणि वेग बृहस्पती ॥ धैर्य जेवीं जलपती ॥
दास म्हणे दिनकर ॥ मावळतां अंधःकार ॥ १ ॥

## अभंग ४ था.

उष्ण काळिची साउली ॥ पाडसाची ती माउली ॥
बाप माझा बळवंत ॥ विद्येमाजीं एक दंत ॥

दुर्बळांचा कल्पतरु ।। आत्मज्ञानीं उंच मेरू ।।
भुकेल्याचें गोड अन्न ॥ रोगियांसी अमृतपान ॥
दासाचें जीवन ॥ केवी राहे मोन प्राण ।। १ ।।

## अभंग ५ वा.

अरे अंधळयाची काठी ॥ कोणी फेंकीली कपाटीं ॥
आतां मनां हेंची येई ।। तुज भेटु स्वर्गा ठाई ।।
परी येईना मरण ।। कधीं पाहु तें चरण ।।
पळ युगाहुनी थोर ॥ वियोगाचें दुःख फार ॥
दास म्हणे तुच्छ वाटे ॥ धन दारा सुत वीटे ।। १ ।।

## अभंग ६ वा.

चोरें लुटीलें भांडार ॥ पाहुनिया शनीवार ॥
नेला नेला अमुचा प्राण ।। सरदार ग्रहांतुन ।।
अचेतन कलेवर ।। दिपाविण अंधःकार ॥
कुंकु सौभाग्य भूषण ।। दास म्हणे वक्र हीन ॥ १ ॥

## अभंग ७ वा.

कली शत वर्षं जाण ।। चौसष्टांत हें मरण ।।
असें कांरे केलें देवा ॥ नेला आमुचा विसावा ॥
दग्ध झालें मन विज ॥ कोठें न्यावें निज गुज ॥
दास म्हणे लवणावीण ॥ व्यर्थ रांधिलें तें अन्न ॥ १ ॥

## अभंग ८ वा.

तुझी एकोनी काल वार्ता ॥ दुःख जाहलें जें चित्ता ॥
विज वाटे कोसळली ।। सुरी काळजीं घातली ।।
मग करोनी विचार ॥ नाशिवंत हे असार ॥
दिसें जें जें जाई लया ।। दास म्हणे स्थुल काया ॥ १ ॥

## अभंग ९ वा.

शरप्रहाराची व्यथा ॥ बुजे कांहीं काळ जाता ॥
परी प्रेमाची जांचणी ॥ बोलवेना उकलोनी ॥
अवषध रोगावरी ॥ देती जाणते सत्वरीं ॥
यासी उपाय तो काय ॥ शब्द हाची हाय हाय ॥
मीना नको पयघृत ॥ एक जिवन जीवीत ॥
धेनु वच्छ न्याय जेवीं ॥ दास म्हणे बाळ तेवीं ॥ १ ॥

## अभंग १० वा.

काल जेवितां ऐकीला ॥ हस्त कवल गळाला ॥
कोणी गायन वादन ॥ कोणी ईश्वर चिंतन ॥
एकाएकीं आयकीलें ॥ लोकमान्य निवर्तलें ॥
कार्य थांबलें करितां ॥ शब्द फुटे ना बोलतां ॥
मन वेग मावळला ॥ बलवंतो स्थीरावला ॥
दास म्हणे शोक ध्वनीं ॥ नहु ऐकिली श्रवणीं ॥ १ ॥

## अभंग ११ वा.

जुलै एकतीस दिनीं ॥ शनिवारातें श्रवणीं ॥
बारा चाळीसवर रात्र ॥ मावळला आर्य मीत्र
तम दाटलें भूवनीं ॥ माय लेकुरां नगनीं ॥
दास म्हणे शोकामिती ॥ रोम अंगीं उठताती ॥ १ ॥

## अभंग १२ वा.

एक नवल पाहिलें ॥ धर्मबंड वितळलें ॥
रविवारीं अधीकमास ॥ सन एकोणीस वीस ॥
नेतां तुझे कलेवर ॥ एक झालें हारी हार ॥

द्वैत भाव मावळला ॥ वर्ण दंभ शांत झाला ॥
दास म्हणेरे शेवटीं ॥ सत्य दडेना कपाटीं ॥ १ ॥

अभंग १३ वा.

शस्त्र राहातें शेवटीं ॥ चिरजाय उठाउठीं ॥
तेवीं तुझा वाणीरस ॥ जगीं नांदे निरदोष ॥
वृक्ष जातां बिज उरें ॥ गंध सुमनीं संचरें ॥
दश नोहे पाहुं जातां ॥ ज्वाला निघे चेतवीता ॥
येरवीं तें काष्ट पाहीं ॥ अग्नीं अलक्ष विदेहीं ॥
दास म्हणे ओत प्रेत ॥ वसे देहीं बळवंत ॥ १ ॥

अभंग १४ वा.

शंकराचे चाप थोर ॥ कोण उचलील वीर ॥
पण दुर्धर मांडिला ॥ दाशरथी राम आला ॥
त्यानें जिंकीला तो पण ॥ तुजसम अन्य कोण ॥
दास म्हणे एक करी ॥ राहे भक्ताच्या अंतरीं ॥ १ ॥

अभंग १५ वा.

एक करी महाराजा ॥ लोकमान्य विजयध्वजा ॥
स्वर्गीहुन ठेवीं लक्ष ॥ प्रेरी कृपेचे कटाक्ष ॥
भुलसील शांती वरा ॥ वैकुंठीच्या अधीकारा ॥
निशीदिनीं अमृत पान ॥ कैसें होईल स्मरण ॥
दिन वाणीनें बाहता ॥ दया उपजेल चित्ता ॥
दास म्हणे तुझें शील ॥ पुन्हां अकाश येशील ॥ १ ॥

अभंग १६ वा.

नरदेहाची थोरवी ॥ आम्हां दावीली बरवी ॥
येरवीं ते आले गेले ॥ झाले यमाचे अंकीले ॥

साधे स्वार्थ परमार्थ ॥ तुज वरोनी हा अर्थ ।
देह हीरा देवोनिया ॥ शेण बांधीती कासया ॥
पाहुनिया तुजकडे ॥ आम्हा स्फूर्ती बल वाढे ॥
दास म्हणे हेची थोर ॥ पुढें श्वान कीं सुकर ॥ १ ॥

## अभंग १७ वा.

तुका ज्ञानेश्वर भले ॥ ईश स्वरूपीं निमाले ॥
मज वाटे त्याजहुनी ॥ बलवंत बहु गुणी ॥
त्यानें एकची साधीलें ॥ ईहसुखा अंतरले ॥
दोहींकडे उभविली ॥ ध्वजा दासानें पाहीली ॥ १ ॥

## अभंग १८ वा.

तुझ्या किर्तीचा अदित्य ॥ पाहती न दिवा भीत ॥
वनां . ..नन पोर ॥ कैसे राहील ते स्थीर ॥
जिर्ण बोचक...त अग्नी ॥ कोण ठेवी लपवोनी ॥
उर्ण तंतुनें वारण ॥ बांधीता न राहे जाग ॥
द्वेश करीती तस्कर ॥ ईतरां तो पुज्य चंद्र ॥
तुच्छ दक्षाते कां मारी ॥ दास म्हणे सुरांतरी ॥

## अभंग १९ वा.

ईंद्र कोशीचा मिलींद ॥ घेईल कां अर्की स्वाद ॥
दश दिशेनें व्यापिला ॥ मूर्तीमंत सामावला ॥
पाहु जातां तेंची दिसें ॥ मन जाहालेंसें पिसें ॥
दास म्हणे जळीं स्थळीं ॥ बाळकृष्ण अंतराळीं ॥ १ ॥

## अभंग २० वा.

पंख उपाडिता पक्षी होई दीन ॥ खुंटलें गमन सहजची ॥
तैसें झालें आम्हां तुजवांचोनिया ॥

गेलासी सखया फसउनी ॥
मातेविण बाळ दिसें दिनापरीं ॥
सांकडे निवारी कोण त्याचें ॥
दास म्हणे देह आहे जेथवरीं ॥
तुजही वैखरीं वाहीली म्यां ॥ १ ॥

## अभंग २१ वा.

भक्ती बल ध्वजा ज्यानें उभारिली ॥
तुकारामें केली ख्याती बहु ॥
त्याजपुढें कोणीं नाहीं अयकीला ॥
बलवंत आला अकारातें ॥
येथोनिया आतां कलीयुग नष्ट ॥
कृती खलभृष्ट जन्मा आले ॥
ऐसे विर गाढे पुन्हां न मागुती ॥
विकारी कूजती दास म्हणे ॥ १ ॥

## अभंग २२ वा.

ह्रीमुर्ध वदनीं जेव्हां पडलासी ॥
मृत्युही आम्हांसी तेव वेळीं ॥
परी देह आशा मानसीं धरोनी ॥
वापरतो जनीं जैसें तैसें ॥
येरवीं पाहतां प्रेतही ते भले ॥
त्याहूनी विरालें अवसान ॥
बल अभीमान दर्प वितळला ॥
दास म्हणे आला काल नष्ट ॥

## अभंग २३ वा.

तुझे गुण गाता मति हो कुंठीत ॥
नाम बळवंत शोभतसे ॥
जैसें नाम तैसें करोनी करणी ॥
किर्ती त्रिभुवनीं वाढविली ॥
टिळक न म्हणूं तीलक जगाचा ॥
पुरी बुडत्याचा तारूं होशी ॥
देह नाशवंत करणी शाश्वत ॥
विदेहीं वसत दास म्हणे ॥ १ ॥

## अभंग २४ वा.

आमावास्या थोर तिमीर दाटले ॥
तेजीं झांकोळले आर्यबिंब ॥
चौकडीची संख्या येईल मागुती ॥
मान्य बलवंती मित्रोदय ॥
तोंवर ही निशी कुहूचें झांकण ॥
मिथ्या उडुगण लखलखो ॥
संचित अव्यक्त सुखदुःख पंख ॥
दास म्हणे राख कस्तुरीची ॥ १ ॥

## अभंग २५ वा.

बहूत जन्मींचें सत्व तुज ठाईं ॥
म्हणून ह्या देहीं लोकमान्य ॥
विठ्ठल नामाची घेउनियां पथ्य ॥
जाहलासी सत्य दोहोकडे ॥

मनीं भरे हाव पाहतां वळण ॥
परी पूर्वपुण्य किंचीतची ॥
लाओनियां वेड गेलासो शेंवटीं ॥
जन्ममरण काटीं जाळोनिया ॥
योग यागबळें जे न ठाई पडे ॥
तें पद रोकडे सहजची ॥
शेंवटीं मागणें आतां एक देई ॥
दाखविते पायीं दास म्हणे ॥ १ ॥

## लोकमान्य टिळकांची आरती.

[ चाल—आरती विश्वंभरणाला. ]

आरती लोकमान्य प्रभूला ॥ बाल गंगाधर टिळकाला ॥ धृ० ॥ विप्रकुलीं मित्रची अवतरला ॥ वाणीवल मेघ पीयूष द्रवला ॥ ( चाल ) सत्वाद्री जणू स्थुल गमला ॥ ब्रीद बांधुनी ॥ दुष्ट मर्दुनी ॥ धर्मरक्षणीं ॥ निशिदिनीं देह झिजवीला ॥ कोर्ती वधु वरुनी शांत झाला ॥ १ ॥ ( चाल पहिली ) सत्पुरुष वर्ग आजी कळला ॥ दंभ देहांतुनी वितळला ॥ प्रेम ओघचि बह खळबळला ॥ अन्यहिन त्वत्पदोच वळला ॥ पूर्वी ज योग याग केलें ॥ सत्त्वधिर भले ॥ स्वरूप साधीले ॥ मोक्ष मिळविलें ॥ तेवि तुं प्रमथची आजी बनला ॥ छेदूनी जन्ममरणाला ॥ २ ॥ बहुत दिन देह तुं झिजवीला ॥ देऊनी आर्य उन्नतेला ॥ विपिनि पथ विकटचि काढियला ॥ कुहु माजीं दिप पाजळला ॥ दुःख हे थोडक्यांत बोहरी ॥ गती ईश्वरी ॥ फोडली तरी ॥ पोहतां पुरी ॥ शतायूं न आंत मृत्यु आला ॥ वेढीले आमुच्या प्राणाला ॥ ३ ॥ तात तव शोभे का मारी ॥ विघ्नांतक तुं अवतारी ॥ करूनि सम अन्यधर्म कुसरी ॥ प्रेरीले धैर्यास्त्र भू जठरी ॥ स्तवत हे तुजही तव कूला ॥ कोहिनूर भला ॥ कुशी रक्षिला ॥ आम्हां दाविला ॥ करऊनी स्तनपय बाळवीला ॥ धन्य ती जननी सती अवला ॥ ४ ॥ शेंवटीं दासाची विनती ॥ येऊदे तुज सन्नीध अंतीं ॥ ईश स्वरूपाचें एकांतीं ॥ प्रेम प्राशन दे त्यजी भ्रांती ॥ देह हा नाशवंत कळला ॥ शाश्वत असें सन्निध वसें ॥ परि नच दिसें ॥ महाविर विश्वनाथी रमला ॥ म्हणोनी दुर्गम भवतरला ॥ ५ ॥

---

१२७८८

# विनंतीपत्र.

माझे प्रिय मित्र रा. महाविरसिंग विठ्ठलसिंग परदेशी यांची संगित कलिदमन व भक्तिपर अविनाशमाला या दोन पुस्तकांतील दृष्टांत रत्नानें शृंगारलेली व मनुष्यास प्रेमद्रव उत्पन्न करणारीं काव्यें स्फूर्ती पाहून मीं त्यांना कै. लो. बाळ गंगाधर टिळक या सत्पुरुषाचा अभंगरूपानें प्रसार करा अशी विनंति केल्यावरून त्यांनीं ह्या शब्दास मान देऊन ही अभंग दीपिका तयार केली, करितां मी त्यांचा आभारी आहे.

आपला चरण मिलिंद,

**रितकरण पुनमचंद पिंपळगांवकर.**

---

# अभिप्राय.

वाचन हें मनुष्याचें भूषण असल्यामुळें पुस्तकें वाचतांना माझे प्रिय मित्र रा. महाविरसिंग विठ्ठलसिंग परदेशी पिंपळगांवकर यांचे संगित कलिदमन व भक्तिपर अविनाशमाला यांतील परत्रप्रेम, भक्तिबल, विकारनष्टता व तर्कज्ञता अशा सर्वोत्कृष्ट हितावह काव्य वाचनानें झालेला आनंद अभिप्राय रूपानें उघड करण्यांत येत आहे.

आपला हितचिंतक,

**श्री पांडुरंग दिनानाथ इनामदार,**

म्या. श्रीकृष्ण सेवा समाज आळंदी देवाची

( गोपाळपुरा. )

---

सं० कां०प० ५५५

REFBK-0019487

REFBK-0019487

# अमृत संजीवनी

# गोळ्या.

## आर्या.

मरणा नरा या जगतीं शुक्र स्थितीलता उष्ण
विकाराचे ॥
कुजता कितितरी त्यांतची जाति अकाली
स्मरणि अकाराचे ॥ १ ॥
यांतुनी विन्मुख व्हारे क्लेश हरा झणीं अचल
शतहि टिका ॥
त्वरा करा घ्या अनुभव इस वरा ही पीयूष
गुटिका ॥ २

तुम्हाला पुष्कळ दिवस वाचण्याची इच्छा आहे काय असें विचारिलें तर प्रश्नच खोटा ठरेल, सहाजीकच आहे कीं, मरणाचें भय प्रत्येकीं असतेंच; परंतु वीर्यवृद्धि नष्ट झाल्यामुळें त्यापासून बळावलेल्या रोगांत ते जिवंतच प्रेत शृंगार धारण करून हाय, हाय, नामाचा जप करीत बसतात. तेव्हां यांतून क्लेशमुक्त करणारी व गर्मीपासून झालेले उपदंशादि विकार जीर्ण ज्वरापासून अलर अझार वगैरे अनेक रोगांवर अचूक अनुसंधान करणारे या अमृत संजिवनीचा अनुभव घ्याल अशी विनंति आहे. किंमत २१ गोळ्यांच्या बाटलीस १ रुपया. ट. ह. ८४.

पत्ता:—**बजरंगसिंग विठ्ठलसिंग परदेशी,**
मु. पिंपळगांव पेटा–दौंड,
पोष्ट-राहूपिंपळगांव.